उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216
ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

महत्वाचे

विषयः- वनजमीन रायगड.
मौजे चिकणी, ता. रोहा ते मौजे काराव ता. पेण दरम्यान 1100 मि.मि. व 400 मि.मि. व्यासाची भुमिगत पाण्याची पाईपलाईन टाकणेसाठी वनक्षेत्र 0.1186 हेक्टर मागणी प्रस्ताव. मे. जे.एस.डब्ल्यु.स्टिल लि. डोलवी

जावक क्र. ब/20/जमिन/ 1237/2017-18.
अलिबाग - 402 201, दिनांकः 16/6/2017

प्रति,
प्राधिकृत अधिकारी,
जे.एस्.डब्ल्यु. गीतापुरम,
डोलवी, तालुका पेण, जिल्हा रायगड.

संदर्भः- केंद्र शासन पत्र क्र. एफसी-I/एमएच-53/2016-एनजीपी/1896, दिनांक 09/06/2017.

मौजे चिकणी, पाटणसई, ता. रोहा ते मौजे काराव ता. पेण दरम्यान 1100 मि.मि. व 400 मि.मि. व्यासाची भुमिगत पाण्याची पाईपलाईन टाकणेसाठी वनक्षेत्र 0.1186 हेक्टर वनजमिन मागणी प्रस्तावास केंद्रशासनाने संदर्भीय पत्रान्वये शर्ती व अटींचे पूर्ततेचे अधीन राहून तत्वतः मान्यता दिलेली आहे. सोबत सदर पत्राची छायाप्रत जोडली आहे. सदर अटींबाबत खालील प्रमाणे पूर्तता करणेत यावी.

1) अट क्रमांक 1 – विषयांकीत क्षेत्राचा वनाचा दर्जा कायम राहील.
2) अट क्रमांक 2 – वळते होणारे क्षेत्राचे बदल्यांत अवनत वनक्षेत्र 1.00 हेक्टरवर प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनीकरण योजना राबविणेची आहे.
3) अट क्रमांक 3 – प्रस्तुत प्रकल्पांत दंडनिय वनीकरण योजना अवनत वनक्षेत्र 1.00 हेक्टरवर प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने राबविणेची आहे. सदर योजनेसाठी रक्कम रु. 15,64,697/- (पंधरा लाख चौसष्ठ हजार सहाशे सत्त्याणणव) मात्र भरणा करणे आवश्यक आहे.

4) अट क्रमांक 4 – पर्यायी वनीकरण व दंडनिय वनीकरणासाठी प्रस्तावीत अवनत क्षेत्र योग्य प्रमाणातील टोपोशिटवर दर्शवून सदर क्षेत्र डिफरन्सीअल जीपीएस मॅप सॉफ्ट कॉपीसह पूर्तता अहवालासमवेत दाखल करणे आवश्यक आहे.

5) अट क्रमांक 5 – पर्यायी वनीकरणासाठी आवश्यक असणारी रक्कम रु. 15,64,697/- (पंधरा लाख चौसष्ठ हजार सहाशे सत्त्याण्णव) मात्र भरणा करण्यांत यावी.

6) अट क्रमांक 6 – वळते होणारे क्षेत्र 0.1186 हेक्टर ची नेट प्रेझंट व्हॅल्यूची रक्कम रु. 7,30,000/- प्रमाणे रक्कम रु. 86,578/- (रुपये श्याऐंशी हजार पाचशे अठ्ठयाहत्तर मात्र) एवढी भरणा करणे आवश्यक आहे.

7) अट क्रमांक 7 – मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे आवश्यक भासल्यास अधिकची नक्त वर्तमान मुल्य रक्कम भरणा करणेस तयार असलेबाबत हमीपत्र देणे आवश्यक आहे.

8) अट क्रमांक 8 – वरील प्रमाणे सर्व रक्कमा forestclearance.nic.in या ऑन लाईन प्रणालीवरुन चलन जनरेट करुन भरणा करणे आवश्यक आहे.

9) अट क्रमांक 9 – सदर प्रकल्पास जरुरी भासल्यास पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986 अंतर्गत पर्यावरण विभागाकडील नाहरकत घेण्याची जबाबदारी यंत्रणेची राहील.

10) अट क्रमांक 10 – प्रस्तावीत कामासाठी वळतेकरण करावयाचे क्षेत्र हे जागेवर 4 फुट उंचीचे पक्के सिमेंट पिलर्स लावून व त्यावर मागे व पुढे अनुक्रमांक व पिलर्स मधील अंतर नमुद करुन सिमांकीत करावे. सदर काम हे प्रकल्पयंणेने त्यांचे खर्चाने करणेचे आहे.

11) अट क्रमांक 11 – वळते होणारे क्षेत्राचे मोबदल्यांत मृदसंधारणाचे काम वनविभागाचे मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक राहील. तसेच त्याबाबत माहिती पूर्तता अहवालासमवेत दाखल करणे बंधनकारक राहील.

12) अट क्रमांक 12 – कोणत्याही प्रकारे वनक्षेत्रांत मजूर कॅम्प उभारता येणार नाही.

13) अट क्रमांक 13 – सदर प्रस्तावीत कामाचे बांधकामाकरीता जे मजूर व कर्मचारी कार्यरत असतील त्यांना यथायोग्य इंधन पुरविण्यात यावे जेणेकरुन निकटचे वनक्षेत्रातील वृक्षांची हानी होणार नाही याची दक्षता घेणेची जबाबदारी यंत्रणेची राहील.

14) अट क्रमांक 14 – ज्या कामाकरीता वनक्षेत्र वळतीकरण करण्यात येणार आहे त्याच कामाकरीता वनक्षेत्राचा वापर करणे बंधनकारक आहे.

15) अट क्रमांक 15 – प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावांत सादर केलेला ले-आऊट प्लॅन केंद्रशासनाचे पूर्व परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

16) अट क्रमांक 16 – प्रकल्प यंत्रणेस मान्य करण्यात आलेले वळतीकरण वनक्षेत्र कोणत्याही परिस्थितीत इतर यंत्रणा वा व्यक्ती यांना केंद्रशासनाचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतर करता येणार नाही.

17) अट क्रमांक 17 – सदर प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारे वन्यजीवांना हानी वा नुकसान पोहोचणार नाही याबाबत प्रकल्प यंत्रणेने दक्षता घ्यावी.

18) अट क्रमांक 18 – प्रस्तावीत क्षेत्रांत अत्यावश्यक असल्यासच वृक्ष तोड करणेत याची तसेच सदर कार्यवाही ही वनविभागाचे मार्गदर्शन व सनियंत्रणाखालीच करणेत येईल याची दक्षता घ्यावी.

19) अट क्रमांक 19 – प्रथम यंत्रणा, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणया यंत्रणेस रस्त्याचे आखणी मार्गांतर्गत क्षेत्र वळते केलेले असताना, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत केंद्रशासनाची पूर्व परवानगी घेणेपूर्वीच क्षेत्र वापरासाठी दुसरे यंत्रणेसमवेत करार केल्याने वन (संवर्धन) अधि. 1980 चे तरतुदींचा भंग केला आहे. त्याप्रकरणी प्रथम यंत्रणेचे संबंधीत दोषी अधिकारी यांचेवर कारवाई का करण्यांत येऊ नये, याबाबत संबंधीत यंत्रणेचा खुलासा पुर्तता अहवालासमवेत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

20) अट क्रमांक 20 – नुसार वन हक्क अधिनियम, 2006 नुसार जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील वनहक्क बाधीत होत नसल्याबाबत प्रमाणपत्र, केंद्रशासनाकडील दिनांक 5/7/2013 अन्वये विहित केलेल्या नमुन्यांत सादर करावा.

21) अट क्रमांक 21 – प्रकल्पामुळे तुटणा-या वृक्षांमुळे विस्थापीत होणारे पक्षांसाठी कृत्रिम घरटी बसविणे आवश्यक असून त्यासाठी येणारे खर्चाची रक्कम यंत्रणेने भरणे आवश्यक आहे.

22) अट क्रमांक 22 – प्रस्तावांत मंजुर केलेल्या आखणी मार्गात पाईप लाईन टाकताना लगतचे वनक्षेत्राचा वापर खाणकाम किंवा टाकाऊ पदार्थ टाकण्यासाठी करता येणार नाही.

23) अट क्रमांक 23 – प्रकल्प यंत्रणेने प्रती वर्षी 1 जानेवारी व 1 जुलै रोजी प्रकल्प पूर्तता अहवाल केंद्र शासन व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट राज्य, नागपूर यांचेकडे सादर करणेचा आहे.

24) अट क्रमांक 24 – अटींचे पूर्ततेबाबत राज्यशासनाकडून संनियंत्रण करुन प्रत्येक वर्षी 31 डिसेंबर रोजी अहवाल केंद्रशासनाकडे सादर करावयाचा आहे.

25) अट क्रमांक 25 – पर्यावरण व वन मंत्रालयांने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळो वेळी घातलेल्या व घालणेत येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

26) अट क्रमांक 26 – प्रकल्पास लागू असलेले प्रचलित सर्व कायदे, नियम, नियमावली यांचे पालन करण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

27) अट क्रमांक 27 – पर्यावरण व वन मंत्रालयाचे पत्र दिनांक 7/1/2015 मधील मार्गदर्शन सुचनांनुसार काम सुरु करणेस परवानगी देणेची आहे.

वरील प्रमाणे सर्व रक्कमेचा भरणा ऑनलाईन प्रणालीवर ई-चलन व्दारे कॉर्पोरेशन बँक, नवी दिल्ली येथील अॅड हॉक कॅम्पा, नवी दिल्ली या बचत खात्यात करुन या कार्यालयास अवगत करावे.

आपणाकडून वरील प्रमाणे प्रामुख्याने अट क्र. 4,5,6,8,19 व 21 व इतर सर्व अटींची पूर्तता करणेत आलेवर सदर प्रस्तावास अंतीम मान्यता घेणेकामी अहवाल वरीष्ठांमार्फत शासनाकडे सादर करणेत येईल.

प्रस्तावांत केंद्रशासनाकडील मार्गदर्शक सुचनांनुसार जोपर्यंत काम सुरु करणेस मान्यता प्राप्त होत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारे वनेत्तर कामे करण्यात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- प्रकल्प संचालक, पीआययु, पनवेल, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेल यांचेकडे माहितीसाठी व जरुरी तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

2/- सोबत केंद्रशासनाचे संदर्भीय पत्र जोडले आहे. सदर पत्रातील अट क्र. 19 मधील सुचनांप्रमाणे कार्यवाही करुन संबंधीत दोषी अधिकारी यांचे खुलासे प्राप्त करुन या कार्यालयात तात्काळ दाखल करावेत ही विनंती.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे माहिती व वनक्षेत्रपाल नागोठणे यांचेकडून खालील प्रमाणे पूर्तता करुन अहवाल अभिप्रायासह या कार्यालयात सादर करणेसाठी रवाना.

प्रतः- वनक्षेत्रपाल नागोठणे यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी रवाना.

2/- सोबत मंजुरी पत्राची प्रत जोडली आहे. सदर पत्रातील अट क्र. 4, 11, 19 व 21 बाबत पूर्तता करुन सहा. वनसंरक्षक, अलिबाग यांचेमार्फत अहवाल या कार्यालयात सादर करणेसाठी रवाना.

प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग यांचेकडे माहिती व केंद्रशासनाचे पत्रातील अट क्र. 4 प्रमाणे तात्काळ कार्यवाही करुन टोपोशीट 5 प्रतीत सादर करणेसाठी रवाना.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.